ISSN 2229-4856

# अभिसरण
# Abhisaran

Issue XIII July to December - 2014

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


1) **कविवर्य वा.रा. कांत यांची प्रेम आणि कथात्म कविता**
डॉ. विद्यासागर पाटंगणकर 01

2) **मराठी साहित्य आणि देवदासी समस्या : काही दृष्टिकोन**
डॉ. शशिकांत ना. खिलारे 13

3) **भटक्या जमातींची आत्मकथने : एक दृष्टिक्षेप**
द्रौपदी पंदिलवाड 18

4) **श्याम मनोहरांच्या कथेतील जाणिवांचा शोध**
प्रा. जिजा शिंदे 23

5) **स्त्री विमर्श की चुनौतियाँ** 27
डॉ. बसवराज के. बारकेर

6) **अज्ञेय, मुक्तिबोध और नयी कविता** 34
डॉ. ललिता राठोड

7) **साहित्य और इतिहास का परस्पर संबंध** 40
**(हिंदी उपन्यास के संदर्भ में)**
डॉ. अमोल पालकर

8) **विवेकी राय के कथा साहित्य में नारी शिक्षा** 43
डॉ. विजय शिंदे

9) **मुक्तिबोध के काव्य का हिन्दी कविता में महत्त्व** 47
डॉ. ओमप्रकाश झंवर

10) **विज्ञान कथा 'बर्बरीक उवाच' में मानव की बर्बरता** 50
डॉ. भाऊसाहेब रा. नळे

11) **भारतातील अशासकीय संस्थांचा** (Non-Government 55
Organizations) **इतिहास**
डॉ. एस.एन.गायकवाड

12) **माणदेशातील दुष्काळ : प्राचीन मध्ययुगीन व मराठा कालखंड** 58
सौ. सीमा नवनाथ इंदलकर
डॉ. व्ही.एच. निंबाळकर

13) **खिलाफत चळवळ** 60
प्रा.डॉ. शेख कलीम माहियोद्दीन

14) **महाराष्ट्रातील संमिश्रे–सरकार : एक मूल्यमापन** 64
डॉ. विजय पाटील




Scanned by CamScanner

# खिलाफत चळवळ

प्रा.डॉ. शेख कलीम माहियोद्दीन

**प्रास्ताविक :**

अनेक शतकापासून तुर्की साम्राज्याचा राजा हा मुस्लिम जगामध्ये मुस्लिमांचा खलीफा (धर्म प्रमुख) मानला जात होता. मुस्लिम भारतात राहत असले तरी त्यांच्या धर्म निष्ठा तुर्कस्तानाच्या सुलतानाशी (खलीफाशी) निगडीत होत्या. फेब्रुवारी १९२० मध्ये बंगाल मध्ये भरलेल्या खिलाफत कॉन्फरेन्सच्या अध्यक्ष पदावरून बोलताना मौलाना अबुल कलाम आझाद यांनी खिलाफत प्रश्न इस्लाम धर्माशी कसा संबंधित आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या मते ''इस्लामच्या कायद्या प्रमाणे मुसलमानांचा एक खलीफा व इमाम असने आवश्यक आहे. अनेक शतकापासून इस्लामी खिलाफतीचे पद तुर्कस्थानच्या सुलतानाकडे आहे. आजपर्यंत जगातील सर्व मुस्लिमांचे खलिफा (धर्मप्रमुख) व इमाम तेच आहेत. तुर्की सुलतानाचे श्रेष्ठत्व मानने व आदेशाचे पालन करणे प्रत्येक मुस्लिमांचे परम कर्तव्य आहे. जे खलिफांचे श्रेष्ठत्व व आदेश मानणार नाही त्या व्यक्तीचा इस्लामशी संबंध राहणार नाही.''[१]

खिलाफत परिषदेमध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांनी वरील भाषण करून खिलाफतीचे महत्व पटवुन देण्याचा प्रयत्न केला होता. तुर्कस्थानाचे विशाल भुप्रदेशावर साम्राज्य पसरलेले होते. मक्का आणि मदिना ही मुस्लिमांची पवित्र धार्मिक स्थाने तुर्कस्थानाच्या साम्राज्यात होती. तुर्कस्थानच्या सुलतानाचे (खलिफाचे) मुस्लिमांच्या धार्मिक स्थळावर नियंत्रण होते. युरोपीयन राष्ट्रांच्या धोरणामुळे एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या प्रारंभी तुर्कस्थानाच्या बलशाली व विशाल साम्राज्याचे विघटन झाले. पहिल्या महायुद्धामध्ये तुर्कस्थानने जर्मनीच्या बाजुने व इंग्लंडच्या विरोधात प्रवेश केला. इंग्लंडला जर्मनीच्या सहकार्याने पहिल्या महायुद्धात हरवून तुर्कस्थानला आपले वैभवशाली साम्राज्य पुन्हा एकदा निर्माण करावयाचे होते. तुर्कस्थानाच्या विरोधात चाललेल्या युद्धामध्ये भारतीय मुस्लिमांचा पाठिंबा मिळवण्यासाठी तुर्की साम्राज्याला हात लावणार नाही आणि मुस्लिमांची पवित्र धार्मिक स्थळे मक्का आणि मदिना यांनाही धक्का लागू देणार नाही या सारखी आश्वासने भारतीय मुस्लिमांना देवुन ब्रिटिश सरकारने युद्धा काळात परिस्थितीवर नियंत्रण प्रस्थापित केले होते, परंतु युद्ध समाप्तीनंतर विजयी राष्ट्रांनी विशेष करून इंग्लंडने तुर्की साम्राज्याचे निरनिराळे तुकडे केले. स्वतः इंग्लंडने तुर्कस्थानचा बराचसा प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला. तुर्की सुलतानाचे नियंत्रण नष्ट झाले. खिलाफत या पदाच्या प्रतिष्ठेला धक्का बसला. युद्धापूर्वी ब्रिटिशांनी दिलेले आश्वासन त्यांनी पाळले नाही म्हणून भारतीय मुस्लिम नाराज झाले. या सर्व परिस्थितीला ब्रिटिशच जबाबदार आहे म्हणून भारतातील मुस्लिमांनी ब्रिटिशांच्या विरुद्ध खिलाफत नावाची चळवळ सुरू केली.

तुर्कस्थानच्या खलीफाची सत्ता व गतवैभव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी ''सप्टेंबर १९१९ मध्ये एक अखिल भारतीय स्तरावर कार्य करणाऱ्या खिलाफत समितीची स्थापना करण्यात आली. मुंबईचे शेख छोटाना या समितीचे अध्यक्ष होते तर शौकत अली सचिव होते.''[२] गांधीजींचे हिंदु-मुस्लिम ऐक्य घडवुन आणण्याचे स्वप्न होते. महात्मा गांधीजींनी या संधीचा फायदा घेऊन हिंदु-मुस्लिम ऐक्य निर्माण करण्याचा व असहकार चळवळीला मुस्लिमांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. खिलाफतीची समस्या ही

हिंदु-मुस्लिम ऐक्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने शंभर वर्षात ही पुन्हा कदाचित येणार नाही अशी संधी आहे असे गांधीजींनी म्हटले होते. असहकार चळवळीला मुस्लिमांचा अधिक पाठिंबा मिळावा म्हणून गांधीजींनी अगदी सुरूवातीलाच खिलाफत चळवळीला आपला पाठिंबा जाहीर केला.

खिलाफत समस्येवर विचार करण्यासाठी खिलाफत समितीने २३ नोव्हेंबर १९१९ मध्ये दिल्ली येथे पहिली खिलाफत परिषद भरविली. या परिषदेचे अध्यक्ष फजलुल हक हे होते. या परिषदेला महात्मा गांधीजी, मोतीलाल नेहरू, पंडित मदन मोहन मालविय हे या परिषदेला उपस्थित होते. या परिषदेत त्यांची भाषणे झाली. या परिषदेच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २४ नोव्हेंबर १९१९ रोजी भरलेल्या खिलाफत परिषदेचे गांधीजी अध्यक्ष होते. महात्मा गांधीजींनी आपल्या भाषणात सांगितले होते की, हिंदुंनी खिलाफत चळवळीला सहकार्य करावे व मुस्लिमांनी असहकार चळवळीच्या मार्गानेच आपली चळवळ पुढे चालवावी असे प्रतिपादन केले. मुस्लिमांवर झालेल्या अन्याया विरुद्धच्या लढ्यात असहकार व बहिष्कार ही दोन शस्त्रे परिणामकारक ठरतील असे गांधीजींनी आपल्या भाषणात सांगितले होते. या परिषदेत भारतातील मुस्लिमांनी खिलाफतीच्या समस्येवर कोणती भूमिका घ्यावी हे निश्चित करण्यात आले व अशा प्रकारे भारतात खिलाफत चळवळ सुरू झाली. याच परिषदेच्या वेळी दिल्लीत अधिक तर उलेमा जमा झाले होते. त्या प्रसंगीच उलेमांनी जमियत उल्मा-ए-हिंद या उलेमांच्या संघटनेची स्थापना केली.[३] या संघटनेचे अधिकतर उलेमा खिलाफत चळवळीत सामील होते.

कराची येथे ८ जुलै १९२१ रोजी भरलेल्या खिलाफत परिषदेने काँग्रेसच्या असहकार कार्यक्रमाला मंजुरी दिली. या परिषदेने पुढील सुचना केल्या होत्या.

१. ब्रिटिशांच्याकडून तुर्कस्थानच्या सार्वभौमत्वावर बंधने पडतील अशा कोणत्याही अटींना मान्यता न देणे.
२. इस्लामच्या पवित्र स्थळांवर अमुस्लिमांचे नियंत्रण अमान्य करणे.
३. ब्रिटिश लष्करामध्ये मुस्लिमांनी नौकरी करू नये.

१९ सप्टेंबर १९२१ ला कराची येथे मौलाना मोहम्मद अली यांच्या अध्यक्षतेखाली खिलाफत परिषद भरली होती. परिषदेमध्ये उलेमा आणि दुसरे पुढारी सामील झाले होते. मुस्लिमांनी इंग्रजांच्या फौजेत नौकरी करू नये असा ठराव या परिषदेमध्ये मांडला होता. परिषदेत उपस्थित असलेले मौलाना शौकत अली, मौलाना हुसैन अहमद मदनी, मौलाना निसार अहमद, पिर गुलाम मुजदद, डॉ. सैफोद्दीन किचलु, जगत गुरू शंकर आचार्य यांचेही भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात या ठरावाचे समर्थन केले व नंतर हा ठराव मंजुर झाला.

कराचीच्या परिषदेनंतर मौलाना मोहम्मद अली यांनी महात्मा गांधी बरोबर देशाचा दौरा सुरू केला. विविध ठिकाणी सभा सम्मेलने घेऊन जागृती निर्माण केली. प्रजेला हिंसेसाठी प्रवृत्त करण्याचा दोघांवर आरोप लावून त्यांना अटक करण्यात आली. कराचीच्या खिलाफत परिषदमध्ये ज्या ज्या पुढाऱ्यांनी भाषणे केली होती म्हणजे मौलाना हुसेन अहमद मदनी, मौलाना शौकत अली, मौलाना निसार अहमद, डॉ. सैफोद्दयन किचलु, जगत गुरू शंकर आचार्य, पीर गुलाम मुजदद यांना अटक केली. या सर्वांवर लष्करामध्ये बंडाला प्रोत्साहन देण्याचा आरोप लावून सरकारने जगत गुरू स्वामी शंकर आचार्य यांना एक वर्षाची व बाकीच्या सर्वांना दोन दोन वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा दिली. महात्मा गांधींनी आपल्या कौशल्याने खिलाफत चळवळीच्या माध्यमातून भारतीय लोकांना स्वातंत्र्य चळवळीत सामील करून घेण्याचा प्रयत्न केला. मौलाना मोहम्मद अली जोहर यांच्या मातोश्री बी अम्मा यांनी ही खिलाफत चळवळीला व भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला होता.

मोहम्मद अली जोहर प्रमाणेच महात्मा गांधींनी

Scanned by CamScanner

खिलाफत चळवळीचे नेतृत्व केले. गांधीजींच्या नेतृत्वामुळे खिलाफत चळवळ फार प्रभावी बनली. गांधीजींनी जाहीर केले होते की, "खिलाफतीचा प्रश्न मुस्लिमांचा धार्मिक प्रश्न आहे. आमचे मुस्लिम बांधव खिलाफतीच्या समस्येने चिंतीत असल्यामुळे आम्ही शांत राहु शकत नाही. गांधीजींनी आपल्या भाषणामध्ये वेळोवेळी जाहीर केले होते की, खिलाफत मुस्लिमांचा पवित्र प्रश्न समजुन मी या चळवळीमध्ये सामील झालो."[४]

खिलाफत चळवळ अयशस्वी झाल्यानंतर गांधीजींनी सांगितले होते की, खिलाफत चळवळीच्या काळातच मला जाणीव झाली असती की खिलाफत चळवळ अयशस्वी होणार आहे तरी ही मी पूर्ण उत्साहाने खिलाफत चळवळीत भाग घेतला असता. भारताचे तत्कालीन सर्वश्रेष्ठ पुढारी, नेते, पंडित मोतीलाल नेहरु, सी.आर.दासस, बीपीन चंद्रपाल, पंडित मोहन मालवीय, लाला लजपत रॉय गांधीजींच्या वरील विचाराशी सहमत होते. यावरून हे सिद्ध होते की, मोहम्मद अली जोहर व मौलाना व शौकत अली यांची खिलाफत चळवळ अगदी योग्य होती.

"खिलाफत चळवळीविषयी काझी अदिल अब्बासी म्हणतात, खिलाफत चळवळीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या चळवळीमुळे हिंदु-मुस्लिम एकता प्रस्थापित झाली. भारतीय लोक ब्रिटिश विरोधी बनले. प्रत्येक नागरिक राष्ट्रीय अभिमान, व स्वातंत्र्याविषयी विचार करू लागला. खिलाफत चळवळ एक पेटलेली मशाल होती. तिने भारताच्या आत्म्याला प्रकाशित केले."[५]

मौलाना मोहम्मद अली यांनी खिलाफत चळवळीसाठी कामरेड या वर्तमान पत्रात लोकांना आवाहन करून पैसा जमा केला. पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने २ नोव्हेंबर १९१४ मध्ये एक घोषणा केली होकी की, "भारतीय मुस्लिमांना आम्ही आश्वासन देतो की, आम्ही किंवा आमची मित्र राष्ट्रे अशी कुठलीही कृती करणार नाही, ज्यामुळे मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातील. आमचा लढा तुर्की शासकांशी आहे. मुस्लिमांच्या खकिफाशी नाही."[६] परंतु वरील आश्वासन ब्रिटिशांनी पाळले नाही.

पहिल्या महायुद्धाची घोषणा झाल्यानंतर मौलाना मोहम्मद अली यांनी कॉम्रेड या वर्तमान पत्रामध्ये या विषयी एक लेख लिहून ब्रिटिशांवर टिका केली होती. ब्रिटिशांनी कॉम्रेड वर बंदी घालून मौलाना मोहम्मद अली व मौलाना शौकत अली यांना नजर कैद केले. पहिल्या महायुद्धात इंग्लंडचा विजय झाला. इंग्लंडने तुर्कस्तानवर अपमानास्पद तह लादला. ३० ऑक्टोबर १९१८ ला तुर्कस्तानने युद्धबंदीच्या तहावर सही केली. इंग्लंड व त्याच्या मित्र राष्ट्रांनी तुर्की साम्राज्याचे विविध तुकडे केले. अरब राष्ट्रे ब्रिटिशांच्या कुट नितीमुळे तुर्की साम्राज्यापासून फुटली. मुस्लिमांच्या पवित्र धार्मिक तुर्कस्थानचे नियंत्रण संपले. यामुळे तुर्की खलिफाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्व कमी झाले. भारतात मुस्लिमांनी ब्रिटिशांच्या कपट नितीला विरोध केला व तुर्की खलिफाचे पूर्व वैभव बहाल व्हावे यासाठी प्रयत्न केले परंतु ब्रिटिशांनी ते होवु दिले नाही. नदवतुल-उलमा यांनीही ब्रिटिशांच्या स्वातंत्र्य विरोधी व खलिफा विरोधी धोरणाचा विरोध केला होता. खिलाफत परिषदेने देशात अनेक ठिकाणी सभा घेऊन खिलाफत प्रश्नाविषयी जागृती निर्माण करून स्वातंत्र्य आंदोलनाला तीव्र करण्याचा प्रयत्न केला.

३ मार्च १९२४ ला तुर्कस्थानमध्ये मुस्तफा कमाल पाशाच्या नेतृत्वाखाली क्रांती झाली. कमाल पाशाने तुर्कस्तान मधील खिलाफत विसर्जीत केली. अशा प्रमाणे तुर्कस्थानमधील खिलाफत संपुष्टात आली. तुर्कस्तानमधील खिलाफत संपली असताना सुद्धा भारतामधील खिलाफत चळवळीच्या नेत्यांनी शेवटपर्यंत देशाच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केले.

खिलाफत चळवळीमुळे भारतात हिंदु-मुस्लिमांमध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण झाली. या चळवळीमुळे भारतीयांत आत्मविश्वासाची भावना



Scanned by CamScanner

निर्माण झाली. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आत्मविश्वासाने कार्य करणे आवश्यक आहे ही गोष्ट भारतीयांना पटली. या चळवळीमुळे सर सय्यद अहमद खॉनच्या अलीगड चळवळीवर दुरगामी परिणाम झाले. गांधीजींच्या असहकार चळवळीत देशातील सर्व मुसलमान मोठ्या उत्साहाने सामील झाले. एप्रिल १९२४ च्या "Young India" मध्ये गांधीजींनी लिहिले होते "खिलाफत चळवळीमुळे राष्ट्रीय स्तरावर जागृती झाली, आणि मी या जागृतीला झोपू देणार नाही."[७] भारतीयांना आपल्या हक्काची जाणीव झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला खिलाफत चळवळीमुळे चांगला हातभार लागला.

**संदर्भ :**


१. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत. पान क्र.१५ प्रकाशक : कौमी कौन्सिल बराए-बरोग उर्दु जबान, नवी दिल्ली. प्रथम प्रकाशन १९७८.
२. डॉ. गाठाळ सोहबराव : आधुनिक भारताचा इतिहास पान क्र.१२८ प्रकाशक : कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद प्रथम प्रकाशन १९९८.
३. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत पान क्र.४० प्रकाशक : कौमी कौन्सिल बराए फरोग उर्दु जबान नवी दिल्ली, प्रथम प्रकाशन १९७८.
४. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत पान क्र.७९-८०
५. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत पान क्र.२७१
६. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत पान क्र.६८
७. काझी मोहम्मद अदिल अब्बासी : तहरीक-ए-खिलाफत पान क्र.२७१



इतिहास विभाग प्रमुख,
मिल्लिया कला व विज्ञान महाविद्यालय,
बीड.





Scanned by CamScanner